आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२२ जून २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- स्पर्धा परीक्षांमधल्या गैरप्रकारांबद्दल १० वर्षे पर्यंत तुरुंगवास आणि १ कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करणारा कायदा आजपासून लागू

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि बांग्ला देशच्या प्रधानमंत्री शेख हसीना यांच्यात द्विपक्षीय चर्चा/ महत्त्वाच्या करारांवर होणार स्वाक्षऱ्या

- अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अर्थमंत्र्यांची बैठक सुरु

- १८ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा काल मुंबईत समारोप

**आणि**

- टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज सुपर ८ मध्ये भारताचा सामना बांगलादेशबरोबर

**<><><><><>**

विविध स्पर्धा परीक्षांमधल्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारनं कठोर कायदा केला आहे. दोषींना १० वर्षे पर्यंत तुरुंगवास आणि १ कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. या तरतुदी आजपासून लागू होत असल्याचं राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेत म्हटलं  आहे. 'सार्वजनिक परीक्षांमधील अयोग्य माध्यमांचा प्रतिबंध विधेयक, २०२४' लोकसभेने ६ फेब्रुवारीला राज्यसभेने ९ फेब्रुवारी रोजी मंजूर केलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी १२ फेब्रुवारी रोजी विधेयकावर स्वाक्षरी केली. केंद्रीय लोकसेवा आयोग, कर्मचारी निवड आयोग, नॅशनल टेस्टिंग एजन्सी NTA, रेल्वे भरती आणि बँकिंग भरती परीक्षा अशा विविध

सार्वजनिक परीक्षांमध्ये होणार्या  अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी हा कायदा आहे. फसवणुकीबद्दल किमान तीन ते पाच वर्षांचा तुरुंगवास आणि फसवणुकीच्या संघटित गुन्ह्यामध्ये सहभागाबद्दल ५ ते १० वर्षांचा तुरुंगवास आणि किमान एक कोटी रुपये दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

<><><><><>

CSIR-UGC-NET ही २५ ते २७ जून रोजी संयुक्तपणे घेण्यात येणारी परीक्षा काही अपरिहार्य कारणामुळे तसंच तांत्रिक अडचणीमुळे पुढे ढकलण्यात आली आहे.

या परीक्षेचं सुधारित वेळापत्रक नॅशनल टेस्टिंग एजन्सी-एन टी ए च्या अधिकृत वेबसाइटवर जाहीर केलं जाईल, असं NTA ने कळवलं आहे. आधिक महितीसाठी, परीक्षार्थींना ०११-४०७५९००० किंवा ०११-६९२२७७०० या मदत क्रमांकांवर किंवा csirnet@nta.ac.in या ईमेल द्वारे NTA शी संपर्क साधता येणार आहे.

<><><><><>

बांग्ला देशच्या प्रधानमंत्री शेख हसीना कालपासून दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आल्या आहेत. राष्ट्रपती भवनात त्यांना पारंपरिक पद्धतीनं मानवंदना देण्यात आली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत हैद्राबाद हाऊस इथं शेख हसीना यांचं औपचारिक स्वागत केलं. दोन्ही देशांमधल्या व्यापार वाणिज्य विषयक संबंधांवर उभय नेत्यांमधे चर्चा सुरु आहे. रेल्वे, दळणवळण, उर्जा, उद्योग यासह तिस्ता नदीच्या पाणीवाटपाविषयी देखील त्यांच्यात चर्चा होत आहे. बांग्ला देशबरोबर काही महत्त्वाचे करार या भेटीत होणार आहेत. शेख हसीना आज

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची भेट घेणार असून, काल त्यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांच्याशी चर्चा केली. नवी दिल्लीत राजघाट इथं महात्मा गांधींच्या समाधिस्थळी भेट देऊन त्यांनी आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अर्थमंत्र्यांची बैठक उपस्थितीत नवी दिल्लीत होत आहे. या बैठकीला गोवा, मिझोराम, नागालँड आणि सिक्कीमचे मुख्यमंत्री तसंच बिहार, मध्य प्रदेश, ओदिशा, राजस्थान आणि तेलंगणाच्या उपमुख्यमंत्र्यांसह अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, अर्थ सचिव टी व्ही सोमनाथन आणि आर्थिक व्यवहार विभागाचे सचिव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित आहेत. सीतारामन यांनी काल शेतकरी संघटना आणि कृषी अर्थतज्ज्ञ प्रतिनिधींसह अर्थसंकल्पपूर्व चर्चासत्र आयोजित केलं होत. त्याआधी, त्यांनी आर्थिक आणि भांडवली बाजार तज्ञ, उद्योजक आणि इतर संघटनांसह आघाडीच्या अर्थतज्ज्ञांबरोबर बैठकीचं आयोजन केलं होत.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेची ५३ वी बैठक आज नवी दिल्लीत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर जीएसटी परिषदेची ही पहिलीच बैठक आहे. ऑनलाईन गेमिंगवर कर लावण्यासंदर्भात आजच्या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. यापूर्वीची बैठक गेल्या वर्षी ७ ऑक्टोबरला झाली होती.

**<><><><><>**

१८ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा काल मुंबईत एका दिमाखदार सोहळ्यात समारोप झाला. यावेळी 'The Golden Thread' या माहितीपटाला आंतरराष्ट्रीय श्रेणीत सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ अभिनेत्री पूनम धिल्लाँ यांनी चित्रपटाच्या दिग्दर्शक निशिता जैन यांना सुवर्ण शंख, १० लाख रुपये आणि प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केलं. विविध श्रेणीत सर्वोत्कृष्ट ठरलेल्या लघुपट आणि माहितीपटांनाही यावेळी गौरवण्यात आलं. महोत्सवाचे संचालक पृथुल कुमार यांनी महोत्सवाला सहाय्य करणाऱ्या चित्रपट प्रेमींचे, परीक्षकांचे, केंद्र आणि महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. 'इंडिया इन अमृतकाल' या विशेष विभागात एडमन रॅनसन दिग्दर्शित लाइफ इन लूम या लघुपटाला सर्वोत्तम लघुपटाचा पुरस्कार मिळाला. तर श्रीमयी सिंग यांना 'अँड टूवर्ड्स हॅप्पी अलाइज' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ठ नवोदित दिग्दर्शकाचा दादासाहेब फाळके चित्रनगरी पुरस्कार मिळाला. या समारोप सोहळ्याला महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**<><><><><>**

महाराष्ट्रात पुन्हा डबल इंजिनचे सरकार येणार असल्याचं भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. भाजप प्रदेश कोअर कमिटीची बैठक काल रात्री उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शासकीय निवासस्थानी झाली. लोकसभा निवडणुकीत जिथेकमकुवत होतो, तिथे अधिक मेहनत करू असं बावनकुळे यांनी बैठकीनंतर बातमीदारांशी बोलताना सांगितलं. बैठकीत आगामी विधानसभा निवडणुका, विधानपरिषद निवडणुका आणि महाराष्ट्रातले आरक्षण आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**<><><><><>**

काश्मीरमध्ये लवकरच महाराष्ट्र सदन उभारण्याचा निर्णय राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागानं घेतला आहे. यासाठी जमीन खरेदी करण्यासाठी विभागानं ९ कोटी ३० लाख २४ हजार रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी दिली.

**<><><><>**

तेलंगणातल्या शेतकऱ्यांचं पीक कर्ज माफ करण्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी केली आहे. मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत हा निर्णय झाल्यानंतर वार्ताहरांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. १२ डिसेंबर २०१८ ते १२ डिसेंबर २०२३ या दरम्यान पीक कर्ज घेतलेले शेतकरी या सवलतीसाठी पात्र असतील. कर्जमाफीचे निकष लवकरच जाहीर करण्यात येतील. यासाठी सरकारी तिजोरीतून ३१ हजार कोटी रुपये खर्च होणार असून राज्यातल्या ४० लाख शेतकऱ्यांना याचा फायदा होणार असल्याचं रेड्डी यांनी सांगितलं.

**<><><><>**

हिंदी महासागराच्या नैऋत्य भागात तैनात असलेल्या आय एन एस सुनयना या जहाजानं मॉरिशसच्या पोर्ट लुईस इथं गुरुवारी प्रवेश केला. मॉरिशस विशेष आर्थिक क्षेत्रासह या भागात संयुक्त टेहळणी भारतीय नौदलाची सागरी सुरक्षेबाबत सामायिक वचन अधोरेखित करते. जहाजाचं आगमन झाल्यावर मॉरिशस किनारपट्टी सुरक्षा विभागाच्या ताफ्यानं तसंच मॉरिशस पोलीस दलानं या जहाजाचं स्वागत केलं. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्तानं पोर्ट लुईस इथं आय एन एस सुनयना आणि एम एन सी जी बाराकुडा या जहाजांवर योग सत्राचं आयोजनही करण्यात आलं होतं.

**<><><><>**

राफाहच्या उत्तरेकडे विस्थापित पॅलेस्टिनींसाठी उभारलेल्या छावण्यांवर काल इस्राएलच्या फौजांनी केलेल्या बॉम्बवर्षावात किमान २५ जण मृत्यूमुखी पडले तर इतर ५० जण जखमी झाले. त्याआधी इस्राएली फौजांनी मुवासी या ग्रामीण भागाच्या मध्यवर्ती ठिकणी उभारलेल्या मानवतावादी मदत छावणीच्या परिसरात बॉम्बवर्षाव केला होता. याठिकाणी, विस्थापितांनी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आश्रय घेतला आहे.

**<><><><><>**

आसाममधल्या कामाख्या मंदिरात प्रसिद्ध अशा अंबुबाची मेळ्याला आजपासून सुरुवात झाली. या मेळ्यासाठी लाखो भाविक गुवाहाटी इथं पोहोचले आहेत. या मेळ्याची सांगता २६ जूनला होणार आहे. हा उत्सव प्रजनन आणि स्त्रीत्वाचं प्रतीक मानला जातो. या दरम्यान मंदिराचे दरवाजे सर्वांसाठी बंद केले जाणार आहेत. हे दरवाजे २५ जून रोजी रात्री पुन्हा उघडण्यात येतील.

**<><><><><>**

टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज सुपर ८ मध्ये भारताचा सामना बांगलादेशबरोबर होणार आहे. हा सामना अँटिग्वा इथल्या सर विवियन रिचर्ड्स स्टेडियममध्ये भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ८ वाजल्यापासून खेळवला जाणार आहे. दरम्यान भारतानं सुपर ८ मधल्या आधीच्या सामन्यात अफगाणिस्तानचा ४७ धावांनी पराभव केला होता. आज सकाळी झालेल्या दुसऱ्या एका सामन्यात वेस्ट इंडिजनं अमेरिकेवर ९ गडी राखून विजय मिळवला आहे.

**<><><><><>**

केरळ, कर्नाटक आणि गोवा या राज्यांमध्ये पुढच्या चार दिवसांत अतिवृष्टी होण्याचा अंदाज भारतीय हवामान खात्यानं वर्तवला आहे. तसंच महाराष्ट्र, गुजरात,

लक्षद्वीप, आंध्र प्रदेश, तेलंगण, तामिळनाडू आणि पुडूचेरी इथं वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह मध्यम ते मुसळधार पाऊस पडेल. ईशान्य भारतात आज तर पाच दिवस पश्चिम बंगाल, आसाम इथं अतिवृष्टी होण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. केरळमधल्या सहा जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून तिथे अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

तर पश्चिम उत्तर प्रदेश आणि आजूबाजूच्या प्रदेशात २४ जूनपयर्यंत उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. पुढच्या दोन दिवसांत कमाल तापमानात ३ ते ४ अंश सेल्सिअसनं वाढ होण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//